प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि.११.०१.२०२१**

**सिडको अर्बन हाट येथे हिवाळी महोत्सवाचे आयोजन**

सिडको अर्बन हाट येथे २०२१ या वर्षारंभी हिवाळी महोत्सवाचे (विंटर फेस्टिव्हल) आयोजन करण्यात आले असून **०८ जानेवारी २०२१** ते **१९ जानेवारी २०२१** या कालावधीत **सकाळी ११.००** ते **रात्री ०९.००** या वेळेत हा महोत्सव पार पडणार आहे.

या महोत्सवामध्ये अथर्वची लिनन उत्पादने, कृत्रिम दागिने, स्त्रियांसाठी कुर्ते आणि साड्या, डिझायनर ब्लाउज, ट्रायबल आणि स्टोन ज्वेलरी, जयपूर ज्वेलरी, जर्मन सिल्व्हर ज्वेलरी, बनारसी व रेशमी साड्या, ड्रेस मटेरिअल, पुरुषांसाठी खादीचे कुर्ते, ब्लॉक प्रिंटिंग बेडशीट, वारली, मधुबनी अशा विविध शैलींतील चित्रे, डोअर मॅट, जैविक खाद्य उत्पादने, लोणची, पापड, मसाले अशी विविध उत्पादने प्रदर्शनार्थ आणि विक्रीसाठी उपलब्ध आहेत. कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट कारागिरांकडून ही उत्पादने विकली जात आहेत. रु. ५०० ते रु. १५०० श्रेणीतील वस्त्रप्रावरणेही उपलब्ध आहेत.

अर्बन हाट परिसर स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण असेल याची आयोजकांतर्फे पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे. अर्बन हाटचा परिसर खुला असल्याने तसेच तेथे उभारण्यात येणारे स्टॉल आकाराने मोठे असल्याने सामाजिक अंतराच्या नियमाचे पालन करणे शक्य होणार आहे. अर्बन हाटला भेट द्यायला येणाऱ्यांनी मास्कचा वापर करणे बंधनकारक असणार आहे. तसेच प्रवेशद्वारावरच थर्मल स्कॅनिंग व सॅनिटायझर किंवा हॅन्ड वॉशने निर्जुंतुकीकरण केल्यानंतरच आतमध्ये प्रवेश देण्यात येईल. अर्बन हाटला भेट द्यायला येणाऱ्या पर्यटकांनी आपल्याबरोबर ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना आणून नये तसेच सामाजिक अंतराचे पालन करावे, अशी विनंती आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

हिवाळी महोत्सवातील प्रदर्शनाला भेट देऊन तेथील वस्तू विकत घेतल्याने भारतातील स्थानिक कारागिरांबरोबरच स्वदेशी उत्पादनांनाही प्रोत्साहन मिळणार आहे. दिवसेंदिवस अर्बन हाटला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. पर्यटकांनी अशाप्रकारचे महोत्सव आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. हॅपी म्युझिक ग्रुपतर्फे रविवारी जुन्या गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. हिवाळी महोत्सवानंतर हातमाग आणि हस्तकला प्रदर्शन तसेच क्राफ्ट बाजार हे कार्यक्रम प्रस्तावित आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**